

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

गणपती बप्पा मोरया


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १० • Title - Code :- MAHMAR4951 • रविवार दि.२४ सप्टेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# सहकार चळवळीचे भविष्य उज्ज्वल केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह

## देशातील ३ लाख विकास सेवा संस्थांचे बळकटीकरण करणार








**मुंबई | प्रतिनिधी**

सहकार चळवळीने कालानुरुप स्वत:ला बदलणे आवश्यक आहे. देशात रोजगारनिर्मिती सोबतच आर्थिक विकास वाढविण्याची ताकद सहकार क्षेत्रात आहे. केंद्र सरकारही सहकार विद्यापीठाची स्थापना करुन त्या माध्यमातून बँक, दुग्धव्यवसाय, कृषी, विपणन क्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणार आहे. ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे बळकटीकरण करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे सहकार चळवळ ही कालबाह्य होणार नसून या चळवळीचे भविष्य उज्ज्वल आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.मुंबई विद्यापीठ आणि सहकार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी विद्यापीठाच्या फोर्ट येथील कावसजी जहागीर दीक्षांत सभागृहात लक्ष्मणराव इनामदार यांच्या स्मृतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ना .शाह बोलत होते.

यावेळी राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी, सहकार भारतीचे अध्यक्ष दीनानाथ ठाकूर, राष्ट्रीय महामंत्री उदय जोशी आदी उपस्थित होते.यावेळी केंद्रीय मंत्री शहा म्हणाले की, सहकार चळवळ देशासाठी उपयुक्त आहे. देशासाठी अधिक उत्पादन जेवढे गरजेचे आहे, तेवढेच अधिकाधिक लोकांना रोजगाराची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. सहकार चळवळ ही बाब पूर्ण करु शकते. खऱ्या अर्थाने व्यक्ती हिताचा विचार करणारे हे सहकाराचे मॉडेल असल्याचे त्यांनी सांगितले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवे खाते निर्माण करून सहकार चळवळीत चैतन्य आणले. २०१४ पूर्वी देशातील ६० कोटी लोक बँक व्यवहाराच्या बाहेर होते. त्यांना या परिप्रेक्ष्यात आणले. त्यांना घर, गॅस, वीज, अन्न उपलब्ध करून दिले. आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. हे लोक आता आर्थिक विकासात भागीदार होऊ इच्छितात. त्यांना आता सहकार चळवळीच्या माध्यमातून देश विकासाशी जोडले जात आहे, असे केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले.ग्रामीण विकासाला महत्व देऊन शहरीकरणाकडे वाढणारा ओढा गावातच सुविधा उपलब्ध करुन देत थांबवण्याचा प्रयत्न आता आपण करत आहोत. देशात ३ लाखांहून अधिक विकास सहकारी सेवा संस्था आहेत. आता केवळ एका कामापुरता त्यांचा उपयोग न करता या संस्थांचे संगणकीकरण आणि बळकटीकरण करून त्यांना नागरी सेवा केंद्राप्रमाणे बहुपयोगी करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. ग्रामीण भागाला सहकाराच्या माध्यमातून समृद्ध करण्याच्या प्रयत्नांसोबतच केंद्र सरकारने नागरी सहकारी बँकानाही आता नवीन शाखा, बँक मित्र, मायक्रो एटीएम, कर्ज सुविधा दुप्पट आदी सुविधा देण्यास परवानगी दिली आहे. याशिवाय, नागरी बँकाना इतर राष्ट्रीयीकृत बँकांप्रमाणेच सेटलमेंट करण्याचा अधिकार दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी ना.शाह यांनी सहकार चळवळीचाही आढावा घेतला. सहकार चळवळीने १९०४ पासून वेग धरला. स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीने सगळ्यांच्या हिताचा विचार करून चळवळ पुढे नेली. महाराष्ट्रात विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांनी ही चळवळ सुरु केली. गुजरातमध्ये श्वेतक्रांतीच्या माध्यमातून आमुलाग्र बदल झाले. राज्याच्या विकासात सहकार चळवळीचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी सहकार चळवळीचे मार्गदर्शक लक्ष्मणराव इनामदार यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. महाराष्ट्र ही जन्मभूमी आणि गुजरात कर्मभूमी असलेल्या लक्ष्मणराव इनामदार यांचे नाव आजही गुजरातमधील प्रत्येक गावामध्ये आदराने घेतले जाते. त्यांचा आदर्श ठेवून अनेक कार्यकर्ते तेथे काम करत आहेत. कोणत्याही सहकारी संस्थेचे पदाधिकारी नसताना त्यांनी केलेले काम अनेकांना मार्गदर्शक असे होते, असे ना.शाह यांनी सांगितले.

### सहकारातूनच सर्वसामान्यांचा विकास शक्य– राज्यपाल रमेश बैस

**राज्यपाल बैस म्हणाले की, लक्ष्मणराव इनामदार सहकार क्षेत्राचे आधारस्तंभ आणि मार्गदर्शक होते. समाजात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी आवश्यक बदल सहकार क्षेत्राच्या माध्यमातून घडू शकतील, असा त्यांचा विश्वास होता. कृषी आणि श्वेत क्रांती सहकाराच्या माध्यमातून शक्य झाली आहे. शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या विकासाचा मार्ग सहकाराच्या माध्यमातूनच जातो. साखर कारखानदारी, दूध व्यवसायाबारोबरच वेगवेगळ्या क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून प्रगती होत आहे. सहकारातून राज्यात महाबळेश्वरजवळ उभ्या राहिलेल्या मधाच्या गावाचीही माहिती राज्यपाल श्री. बैस यांनी यावेळी दिली. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात सहकार क्षेत्रातील बदल शेवटच्या घटकाच्या जीवनात मैलाचा दगड ठरेल, असेही त्यांनी सांगितले.**

### सहकार चळवळीला व्यापक स्वरुप लक्ष्मणराव इनामदारांनी दिले– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र आणि गुजरातमधील समान धागा म्हणजे सहकार चळवळ होय. त्यामुळे लक्ष्मणराव इनामदार हे या दोन्ही राज्यातील संवादाचा सेतू होते. त्यांनी सहकार चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. सहकार क्षेत्रातील लक्ष्मणराव इनामदार यांचे कार्य अनुकरणीय आहे. त्यांच्या कार्याची आठवण म्हणून जिहे कठापूर पाणीपुरवठा योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. सहकार चळवळीचा सर्वसामान्य नागरिकांना लाभ होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले, असे त्यांनी सांगितले.**

## नागपुरातील पुरात नुकसान झालेल्यांना फडणवीसां कडून मदतीची घोषणा

नागपुरातील पूरस्थितीचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला आहे. नागपुरात कमी वेळत १०९ मिलिमीटर पाऊसाची नोंद झाली. त्यातील ९० टक्के पाऊस हा फक्त दोन तासांत पडला. त्यामुळे अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाला आणि पूरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली. यात तीन लोकांचा आणि १० जनावरांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती फडणवीसांनी दिली आहे. नागनदीच्या भिंती पडल्यानं नुकसान झालं आहे. लोकांच्या घरात पाणी गेल्यानं गाळ आणि चिखलाची परिस्थिती झाली आहे. अनेक लोकांना स्थलांतरीत केलं असून, जवळपास १० हजार घरांमध्ये पाणी शिरलं आहे. झोपडपट्टी भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. गाळ घरांमध्ये गेल्यानं लोकांना अन्नधान्य फेकून द्यावं लागलं आहे, असं फडणवीसांनी सांगितलं.

## शब्द वेध

### घेणं आता शेकून !

शेजारी शेजारी असून
टँकचे पाणी पडते..
भिंतीवर म्हणून..
भांड भांड भांडले .....

काल पाऊसच पडला
मुसळधार ! आणि
कोसळली एकाची भिंत !
आता ? राग काढावा कुणावर ?
याची वाटेल का जराशी खंत



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

## अन् थेट पालकमंत्री पोहचले शेतकऱ्याच्या बांधावर





# ना.सुधीर मुनगंटीवार यांची जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची मागणी

## प्रत्यक्ष पाहणी करीत सोयाबीन पिकावरील मोझॅक रोगाबद्दल मुख्यमंत्र्यांना घातली साद

**राजुरा | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक नावाच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे हातची पिके निसटलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्यासाठी व त्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार सरसावले आहेत. यासंदर्भात त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर चंद्रपुरात प्रथमच हा रोग आढळून आल्याने एक विशेष पॅकेज चंद्रपूर जिल्ह्यासाठी जाहीर करावा अशी विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केलेली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ६७.७६६ हेक्टरवर सोयाबीनची लागवड होते. वरोरा, भद्रावती, चिमुर, राजुरा, कोरपना, गोंडपिपरी, पोंभुर्णा या तालुक्यांमध्ये हे पीक घेतले जाते. या पिकावर ऑगस्टच्या सुमारास पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाला. कृषी विभागाने प्रयत्न करून या रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी मोहिमही हाती घेतली. परंतु १५ ते १८ सप्टेंबरच्या आसपास अचानक सोयाबीनचे पिक काळवंडले. पावसाचा खंड, वाढलेले उष्णतामान आणि रोगाचा प्रादुर्भाव यामुळे हे घडल्याचे कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले. चंद्रपूर जिल्ह्यातील ही परिस्थिती कळताच ना. सुधीर मुनगंटीवार यांनी राजुरा तालुक्यातील खामोना,पांढरपौनी,हरदोणा ( खु.) येथील शेतशिवरात सोयाबीन पिकावरील रोगामुळे नुकसानग्रस्त भागांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. त्यावेळी त्यांनाही पिकांवर मळकुज, खोडकुज व रायझोक्टोनिया एरीयल ब्लॉईट या रोगांचा प्रादुर्भाव आढळला. या रोगामुळे दोनच दिवसात सोयाबीनचे पीक पिवळे पडले होते. या पाहणीच्या वेळी जिल्हा कृषी अधिकारी शंकर तोटावार, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी आमदार सुदर्शन निमकर, सुनिल उरकुडे, अजय राठोड, अरुण मस्की, हरीदास झाडे, वामन तुरानकर, दिलीप गिरसावळे, कृषी सहाय्यक डांगे हे उपस्थित होते. एकूण हवामान व रोगांच्या प्रादुर्भावामुळे ना. मुनगंटीवार यांना अनेक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेचे भाव व डोळ्याच्या कडा पाणावलेल्या दिसल्या. त्यामुळे त्यांनी तातडीने यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना पत्राद्वारे नुकसाभरपाईची मिळण्यासाठी साद घातली. कृषिमंत्री धनंजयजी मुंडे यांनाही पत्र पाठविले . मृदा संतुलनात मोठा बिघाड निर्माण झाला आहे. हे संतुलन पुन्हा निर्माण करण्याचे मोठे आव्हान यंत्रणेपुढे आहे. सोयाबीनवर तीन प्रकारचे रोग सध्या आहेत. यासंदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या संशोधकांना बोलावून या रोगांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात येणार असल्याचे यावेळी ना.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. पीक नुकसानीसंदर्भात आपण जिल्हाधिकाऱ्यांनाही सूचना केल्या आहेत. नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करताना तो पूर्णपणे शेतकऱ्यांच्या बाजुने असला पाहिजे, शेतकऱ्यांच्या फायद्याचा असला पाहिजे अशा सूचना प्रशासनाला दिल्याचेही ना. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. याबाबत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची चंद्रपूर जिल्ह्यातील परिस्थिती दयनीय झाल्याचे त्यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणुन दिले. नैसर्गिक आपत्ती व रोगांचा प्रादुर्भाव यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या संकटाच्या मालिकेत सापडला आहे. त्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढणे नितांत गरजेचे असल्याचे नमूद करीत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची आग्रही मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या मागील हरभरा पिकाचेही गारपिटीमुळे नुकसान झाले होते याशिवाय ५० हजार रुपये नियमित कर्ज भरणाऱ्यांपैकी काहींच्या खात्यात तांत्रीक कारणाने रक्कम जमा झाली नव्हती, ती रक्कम जमा करण्याबाबतही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री व कृषिमंत्री यांचे लक्ष वेधले.

# २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर संक्रांत!




पोटाची भूक भागविण्यासाठी जशी अन्नाची गरज असते तशी ज्ञानाची भूक भागविण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाचे हे महत्त्व आपल्या थोर महात्म्यांनी ओळखले. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अनेकांनी आयुष्य खर्ची घातले . शिक्षणाचे महत्त्व सांगताना महात्मा ज्योतिराव फुले म्हणतात, विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले शिक्षण नसेल तर माणसाच्या आयुष्यात काय अनर्थ होऊ शकतात हे महात्मा फुले यांनी साध्या आणि सोप्या भाषेत शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगताना सांगितले. पोटाची भूक भागविण्यासाठी एकवेळ अन्न नाही मिळाले तरी चालेल परंतु ज्ञानापासून कोणीही वंचित राहता कामा नये.ही भूमिका घेत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार जोरात झाला आणि घरोघरी शिक्षण घेऊन सर्वसामान्य कुटुंबातील लोकांनी आपली प्रगती करून घेतली. परिणामतः आज घरोघरी पदवीधरांची पिढी दिसते. शिक्षण हे असं शस्त्र आहे की त्याने ज्ञान तर मिळतेच पण व्यक्तिमत्त्वात डोळसपणा येतो. जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मिळतो. इतके सत्व शिक्षणामध्ये आहे. शिक्षणाशिवाय जीवन म्हणजे अळणी म्हणता येईल. आयुष्यात खऱ्या अर्थाने रुचकरपणा येण्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आणि अनिवार्य आहे.

हे सगळे आठवण्याचे कारण म्हणजे राज्य शासन राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. कमी पटसंख्येच्या शाळांना कुलूप ठोकण्याच्या हालचालींना वेग आला आहे. शिक्षणाशी संबंधित विभागाने आदेश काढून तसे प्रस्ताव १५ ऑक्टोबरपर्यंत शासनाला सादर करण्याच्या सूचना दिल्याची माहिती वाचण्यात आली आहे. राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या या आदेशाची अंमलबजावणी होऊन प्रत्यक्षात शाळा बंद झाल्यातर खेड्यापाड्यातील, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आ वासून उभा राहणार आहे. त्यांचे शैक्षणिक आयुष्य अंधकारमय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा.त्यांना संगीत, कला, क्रीडा यांच्यासाठी समर्थक शिक्षक उपलब्ध व्हावे यासाठी आपण हे सर्व करीत असल्याचा दावा शासन करीत असले तरी त्यात फारसे तथ्य आहे असे वाटत नाही. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचा समूह करणे हे शासनाचे धोरण खेड्यापाड्यातील बाल बच्चे कंपनीसाठी घातक ठरणार आहे. विद्यार्थी संख्या कमी आहे म्हणून त्या बंद करणे म्हणजे घरात मच्छर झाले म्हणून घर जाळून टाकल्यासारखे आहे. खरे म्हणजे सर्वांना शिक्षणाचा हक्क या कायद्यानुसार इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक किलोमीटर, तर पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना तीन किलोमीटरच्या परिसरात शाळा उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शासनाच्या शिक्षण मंत्रालयाने यासाठी पुढाकार घेऊन सर्वांना शिक्षणाचा हक्क मिळवून द्यायला पाहिजे. कारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची इतर विभागातील खर्चाशी तुलना करणे हे योग्य नाही. आपण लोककल्याणकारी शासन व्यवस्था स्वीकारलेली आहे.या व्यवस्थेत आर्थिक गोष्टींना महत्त्व देण्यापेक्षा लोकांच्या कल्याणाला अधिक महत्त्व प्राधान्याने दिले जाते. यात नफा नुकसान बघितले जात नाही. परंतु ते होण्याचा



दूरच राहिला. शासन २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या मार्गावर आहे. जवळपास अशा शाळांची संख्या १४,७०० च्या जवळपास असून विद्यार्थी संख्या १ लाख ८५ हजारच्या आसपास असल्याचा दावा केला जात आहे. इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाली तर २९,५०० संख्या असलेल्या शिक्षकांचे भवितव्य सुरक्षित असेलच याची शाश्वती नाही.

यापूर्वीच्या शासनाने गावागावांत शाळा काढून शिक्षणाची गंगा सर्वसामान्य ग्रामीणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र विद्यमान सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरणातील शिफारशीनुसार या शाळांचे रूपांतर समूह शाळांमध्ये केले जाणार असल्याचे सांगत आहे.हे सर्व आपण विद्यार्थ्यांच्या सार्वत्रिक विकासासाठी करणार आहोत असा दावा ते करतात. मात्र या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास या नव्या योजनेमुळे २० किलोमीटर परिसरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा बंद होऊन एकच शाळा सुरू राहील. सुधारित निकष लावुन सुरू केलेल्या नव्या शाळा लांब अंतरावर असल्याने कमी वयाच्या बालकांना शाळेत पाठविणे खेड्यातील पालकांना डोक्याला ताप ठरण्याची शक्यता आहे. कोणीही मायबाप आपल्या मुलींना इतक्या लांब अंतरावर शिकायला पाठवतील हे पटतं नाही. शिक्षणाची खात्री संपणार आहे. त्यामुळे येणाऱ्या आगामी काळात छोटी मुले आणि मुली यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. घरून निघालेल्या मुलगा शाळेत पोहोचेपर्यंत आणि शाळेतून निघालेला हा मुलगा घरी पोहोचेपर्यंत त्यांच्या मनात असुरक्षिततेची तलवार टांगती राहणार आहे. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार? आपल्या मुलांच्या सुरक्षितेचा घोर पालकांना लागणार आहे. कोण पालक आहे जे आपल्या मुलांना जीवावर उदार होऊन शिक्षणासाठी पाठवतील. याचाच अर्थ असा की, हळूहळू ग्रामीण भागातील नवीन पिढी शिक्षणापासून प्रत्यक्षाप्रत्यक्ष दूर सारली जाईल. सर्वांना शिक्षण ही संकल्पना कागदावरच लोळत राहील. केवळ शैक्षणिक खर्च वाचविण्यासाठी शासन असे उद्योग करणार असेल तर शासनाच्या बुद्धिमत्तेची कीव येते. ज्या राज्यात शिक्षणावरील खर्चाचा हिशोब वाचविण्यासाठी असले अघोरी आणि अव्यवहारी प्रकार केले जात असेल ते शासन किती लोकोपयोगी असेल.

लोककल्याणार्थ शिक्षणासाठी आवश्यकतेनुसार बजेट उपलब्ध करून देण्याची शासनाची तयारी असायला पाहिजे. कारण शिक्षणामुळे माणूस साक्षरच होतो असे नाहीतर समाजात, कुटुंबात एक चांगला माणूस म्हणून त्याचे व्यक्तिमत्व घडविण्याचे काम शिक्षण करते. शिक्षणात ज्ञानाचा तिसरा डोळा असतो.ज्याला तो प्राप्त होतो तो आपल्या कुटुंबासह समाजाचीसुद्धा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रगती करत असतो. पर्यायाने राष्ट्राची पिढी सक्षम बनते. शिक्षणाने माणसे पुढे जात असतात. इतरांचा विचार करत असतात. सार्वत्रिक प्रगती करत असतात.अशा समूह संकल्पना राबवून खेड्यापाड्यातील शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र शासन का करत आहे हे समजायला जागा नाही. खरोखरच सरकार लोकोपयोगी आहे असा दावा करत असेल तर शासनाने समूह संकल्पनेच्या शाळेला बांध घातला पाहिजे. खेड्यापाड्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा सुरू ठेवून त्यांतील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजे. जिथे कुठे भौतिक सोयी व शैक्षणिक सोयी कमी आहे त्या उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षणावरील खर्चाची इतर विभागातील खर्चाशी तुलना करून जमत नाही. जे देश शिक्षणावर खर्च करतात ते देश नेहमीच प्रगतीच्या दिशेने भरारी घेत असतात. जिथे शिक्षणावर खर्च कमी होईल त्या देशाची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता लोककल्याणकारी असल्याचा दावा करणाऱ्या शासनाने नक्कीच या निर्णयावर विचार मंथन करावे.

खेड्यापाड्यातील शाळा कशा कायम राहील. ग्रामीण भागातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना कसे शैक्षणिक धडे सहजपणे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे न करता शाळा कुलूपबंद करणे म्हणजे गरजुंना शिक्षणापासून वंचित ठेवणे होय.मायबाप शासनाने या निर्णयावर फेरविचार करण्याची गरज आहे.


# ऋण काढून सण नको!

जगात दरडोई कमी उत्पन्न असतानाही बचतीची सवय अंगी मुरलेले जे देश आहेत; त्यात भारत अग्रभागी आहे. सर्वसामान्य भारतीय माणूस उधळ्या वृत्तीचा किंवा हातात आलेला सगळा पैसा खर्चून टाकणारा नाही. तो चार पैसे मिळाले, तर त्यातला एक पैसा मागे राखायचा प्रयत्न करतो. त्याची ही सवयच मॅक्रो अर्थकारणाला स्थैर्य देत असते. गेल्या वर्षीचे जे आकडे प्रकाशित झाले होते, त्यानुसार सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजे जीडीपीच्या २९.८४ टक्के इतकी बचत भारत करीत होता. त्याचा हा क्रमांक जगात एकोणिसावा होता. मात्र, अनेक विकसित तसेच युरोपीय देश या निकषावर भारताच्या बरेच मागे होते. आता भारताची गेल्या आर्थिक वर्षातील निव्वळ घरगुती बचत ५५ टक्क्यांनी घसरून ५.१ टक्केच झाल्याची आकडेवारी प्रकाशित झाली आहे. हा गेल्या पन्नास वर्षांतील नीचांक असल्याचेही म्हटले जाते. प्रचंड बचत करणारा भारतीय माणूस आणि भारतीय कुटुंबे अशी का वागत आहेत, हा अर्थशास्त्रज्ञांपुढचा एक प्रश्न ठरू शकतो. त्याची उत्तरे शोधावी लागतील.

ही कमी झालेली बचत समजावून घेण्यासाठी आणखी दोन आकडेवाऱ्या पाहणे योग्य ठरेल. एकतर, एरवी बचतीसाठी वापरला जाणारा फार मोठा हिस्सा मालमत्तांच्या खरेदीसाठी खर्ची पडल्याचे आकडेवारी दाखवत आहे. ही एका परीने चांगली खूण आहे. स्थावर किंवा जंगम मालमत्तांची खरेदी ही एका प्रकारे गुंतवणूकच असते. गुंतवणूक ही बचतीशिवाय होऊ शकत नाही आणि तिचे पुन्हा रूपांतर बचतीमध्ये करणे शक्य असते. तेव्हा हा मुद्दा फार काळजीचा मानायचे कारण नाही. दुसरा मुद्दा मात्र काहीसा काळजी करण्याचा आहे. मागच्या आर्थिक वर्षात भारतीय कुटुंबांवर एकत्रितपणे ८.२ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर असल्याचे 'एसबीआय रिसर्च'चा अहवाल सांगतो. कर्ज हीसुद्धा गुंतवणूक असते आणि कर्जातून उभ्या राहणाऱ्या उद्योगांमधून नवी धननिर्मिती होत असते. मात्र, ही कर्जे केवळ गृहोपयोगी किंवा चैनीच्या वस्तू घेण्यासाठी घेतली गेली तर ती फेडण्यासाठी निश्चित, खात्रीचे उत्पन्न असणे आवश्यक असते. तसे ते नसेल, तर या कर्जांचा बोजा कुटुंबांचे अर्थस्वास्थ्य बिघडवू शकतो. तसे नेमक्या किती कुटुंबांच्या बाबतीत झाले आहे, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.वरील कर्जबाजारीपणामध्ये एक कधीही सांगितली न जाणारी किंवा लपून राहणारी बाब आहे. काही काळापूर्वी एक आकडेवारी प्रकाशित झाली होती. तिच्यानुसार दर भारतीयाचे सरासरी दरमहा उत्पन्न एक हजार ६६१ रुपये होते. त्याच काळात प्रत्येक भारतीयाचा दारूवरचा दरमहा सरासरी खर्च एक हजार ९३८ रुपये होता. याच काळात देशातल्या सर्व राज्यांचे अबकारी कर उत्पन्न वाढलेच होते. मात्र, दारूवरच्या वाढत्या खर्चामुळे देशात गरीब कुटुंबांवरचा कर्जाचा भार वाढतो आहे. कर्जाचा वाढता भार, याचाच दुसरा अर्थ उणावत जाणारी बचत. दारूवर रोज अब्जावधी रुपये खर्च करणारी लाखो गरीब कुटुंबे बचत न करता कर्जाच्या विळख्यात सापडत आहेत. मात्र, या रोगाकडे एकही सरकार गंभीरपणे लक्ष देणार नाही, हे उघडच आहे. भारतीयांची बचत कमी होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण सोप्या वाटणाऱ्या हप्त्यांवर होणारी प्रचंड खरेदी हेही असल्याचे उघड झाले आहे. पूर्वी आधी बचत करायची आणि नंतर जमेल तशी वस्तू विकत घ्यायची, अशी मध्यमवर्गीय तसेच मध्यममार्गी रीत होती. ती आता बरोबर उलटी झाली आहे. आधी खर्च करा आणि नंतर कमवा किंवा नंतर फेडा, या कर्ज आणि व्याजाधारित बाजार व्यवस्थेमुळे खिशातली निव्वळ बचत कमी होत चालली आहे. अशा प्रकारे होणारा खर्च सामान्य नागरिकांना कितपत महाग पडतो, याचा नेमका हिशेब अनेकदा मांडला जात नाही. या ताज्या पाहणीत घरे आणि गृहोपयोगी वस्तूंच्या कर्जाचा आकडा ७.१ लाख कोटी रुपयांच्या घरात गेल्याचे दिसते आहे. यातील घरांची खरेदी ही एक प्रकारे गुंतवणूक मानता येते. गृहबांधणी उद्योगातून अर्थकारणाला अनेक प्रकारे चालनाही मिळत असते. मात्र, इतर कर्जे घेताना आपण चंगळवादी सापळ्यात तर सापडत नाही ना, याचा विचार सर्वांनी करायला हवा. प्रत्येक उत्पादक आणि विक्रेता त्याचा माल विकायला बसलेलाच असतो. मात्र, आपला खिसा आणि आपली नेमकी गरज यांची सांगड प्रत्येकाला जागृत ग्राहकाच्या भूमिकेत शिरून घालता आली पाहिजे. ऋषी चार्वाकाने 'ऋणं कृत्वा घृतं पीबेत' असे म्हटल्याचे नोंदले गेले आहे. म्हणजे, कर्जे काढा आणि तूप प्या. थोडक्यात, कर्जे काढून हवी ती चैन करा. पण अशी चैन आधी बचत संपवेल आणि नंतर कर्जबाजारी करेल. यापेक्षा 'ऋण काढून सण करू नका' हा सल्ला अधिक महत्त्वाचा आहे. नव्या पाहणीचा तोच संदेश आहे.

# खडू, फळ्यापलीकडे...

नागरिकविकासाची ठोस उद्दिष्टे समोर ठेवून त्यानुसार वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणपद्धती आखणाऱ्या आणि राबविणाऱ्या फिनलंडकडून आपल्याला बऱ्याच गोष्टी घेण्यासारख्या आहेत. विद्यार्थ्यांचे कुतूहल जागविणे, कार्यरत ठेवणे, नवनिर्मितीकडे कल वाढविणे, शिकण्यामध्ये सहभाग वाढविणे आणि उद्योजकतेचा विकास करणे यांचा त्यात समावेश आहे.भारतीय शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदलाचे वारे वाहत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. ही अंमलबजावणी होत असताना अनेक प्रश्न आणि अडचणी समोर येत आहेत. याची उत्तरे शोधताना असे धोरण राबविणाऱ्या प्रणालीचा जवळून अभ्यास निश्चितच फायदेशीर ठरतो. अशी संधी नुकतीच 'सकाळ एज्युकॉन'तर्फे फिनलंड येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेने मिळवून दिली.फिनलंडने विकसित केलेल्या शिक्षणपद्धतीचा जगभर बोलबाला आहे. या देशाने स्थापित केलेल्या नवनिर्मिती करणाऱ्या शिक्षण केंद्राच्या सहाय्याने भारतात काही प्रयोग सुरू आहेत. मात्र या परिषदेमुळे एकूणच शिक्षणपद्धती मुळातून समजून घेण्याची संधी मिळाली.फिनलंड शिक्षणपद्धतीची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यातील पहिले वैशिष्ट्य हे नागरिक विकासाची ध्येयनिश्चिती हे आहे. फिनलंडचे नागरिक कसे असावेत, हे यातून स्पष्ट होते. नागरिक हे कार्यक्षम आणि नवोन्मेष करणारे, स्वक्षमतांचा उपयोग करू शकणारे, हरहुन्नरी, आयुष्यभर शिकणारे, समाजाप्रती उत्तरदायित्व असणारे,इतरांचा आदर करणारे, आत्मविश्वासयुक्त, भविष्याचा वेध घेणारे, आंतरराष्ट्रीय आकलन असणारे, बहुभाषिक, चिकित्सक व विश्लेषक वृत्तीचे, संवाद साधणारे आणि सहकार्य करणारे असे हवेत.हा राजकीय जाहीरनामा नाही, तर राष्ट्रीय उद्दिष्टे आहेत. याला अनुसरून शिक्षणपद्धतीचा विकास केला गेला. या शिक्षणपद्धतीचा विचार केला तर उद्दिष्टे आणि शिक्षणपद्धती परस्परपूरक कसे आहेत, याची कल्पना येते.फिनलंडच्या शिक्षणपद्धतीत पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत एक समान धागा आहे. विद्यार्थ्यांचे कुतूहल जागविणे, कार्यरत ठेवणे, नवनिर्मितीकडे कल वाढविणे, शिकण्यामध्ये सहभाग वाढविणे आणि उद्योजकतेचा विकास करणे यांचा त्यात समावेश आहे.शालेय पातळीवर खेळ, गाणी, कृतिकार्यक्रम आणि संकल्पनाविकास यावर भर दिला जातो. अंक आणि अक्षरसाक्षरता नंतर येते. मात्र ही साक्षरता लिहिण्या, वाचण्यापुरती मर्यादित न राहता ती आकलनापर्यंत कशी पोहोचेल, याकडे लक्ष दिले जाते.या शिक्षणपद्धतीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षण देणारी समांतर आणि लवचिक व्यवस्था. यात विद्यार्थ्यांना निवडीला वाव आहे. शिवाय आपला निर्णय बदलण्याची मुभा आहे. दोन्हींचा दर्जा समान आहे. व्यावसायिक शिक्षण हे केवळ दिखाऊ नाही, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि तोही व्यावसायिक पातळीवर मिळतो.या संस्थांना व्यावसायिक प्रमाणपत्र देण्याची मान्यता आहे, हे विशेष. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उच्च प्रतीच्या संशोधनाची आवश्यकता असते. फिनलंडमधील संशोधन प्रयोगशाळा केवळ उच्च प्रतीचे संशोधन करीत नाहीत,तर त्या संशोधनाचे





व्यापारीकरण करण्यात अग्रभागी आहेत. या मूलभूत सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांनाही करून दिला जातो. शिक्षणाला सरकारचे भरीव सहाय्य असून एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या दहा टक्के शिक्षणावर खर्च होतो.महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, तिथे राजकीय सोईप्रमाणे शिक्षणात बदल केला जात नाही. शैक्षणिक धोरण हे शिक्षणतज्ज्ञ ठरवतात आणि त्यात आवश्यक बदलही तेच करतात. शैक्षणिक प्रणालीत देशभर समान गुणवत्ता राखली जाते. शिक्षकांची निवड, प्रशिक्षण आणि मूल्यमापन हा कळीचा मुद्दा आहे, याकडे विशेष लक्ष दिले जाते.

तिथे डॉक्टर, वकील यांच्यापेक्षा शिक्षक होण्यास प्राधान्य दिले जाते, यातच सर्व काही आले. या पार्श्वभूमीवर भारताचा विचार केला तर यातील बहुतेक मुद्यांचा समावेश राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केलेला दिसून येतो. मात्र अंमलबजावणीमधील परिणामकारकता वाढविणे गरजेचे आहे.नावापुरती अंमलबजावणी करण्याकडे असलेला कल सर्व प्रयत्नांवर पाणी फिरवतो. त्यासाठी मानसिकतेत बदल हा पहिला आवश्यक घटक आहे. त्यासाठी सर्व शिक्षकांना योग्य प्रशिक्षण देणे जरुरीचे आहे. सुचविलेल्या बदलांचा किती प्रमाणात समावेश करू शकतो, याचे योग्य आकलन करावे लागेल.फिनलंड आणि भारत यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि भौगोलिक परिस्थितीत खूप फरक आहे. आपल्याकडील प्राथमिक शिक्षणाचा विचार केला तर पालक दुसरीमध्ये लिहिता वाचता आले नाही, तर अस्वस्थ होतात.त्यामुळे पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्याला शिकवले जाते. त्याच्या शिकण्याची क्षमता कशी वाढेल, याकडे मात्र दुर्लक्ष होते. उच्च शिक्षणाचा विचार केला तर कृतिशील शिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा अपुऱ्या आहेत.व्यावसायिक आणि कौशल्यशिक्षणासाठी या सुविधा वाढवाव्या लागतील. उद्योजकता वाढविण्याचा आपला मानस असला तरी त्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिक तयारी आणि पोषक वातावरण या दोन्ही बाबी महत्त्वाच्या.फिनलंड येथील विद्यापीठात 'उद्योजकता' या विषयाचा पदवी अभ्यासक्रम चालवला जातो. यात विद्यार्थी स्वतःचे पैसे टाकून कंपनी स्थापन करून ती फायदेशीर करून दाखवतात. यात संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची असते. यातील सुमारे पन्नास टक्के विद्यार्थी उद्योजक बनतात. भारतात असा अभ्यासक्रम चालविल्यास किती प्रतिसाद मिळेल, हे सांगता येत नाही. अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश करणे मात्र आवश्यक आहे.भारतात ग्रामीण, शहरी, प्रगत आणि अप्रगत अशी भौगोलिक असमानता आहे. शिक्षण धोरणाबाबत राष्ट्रीय स्तरावर एकमत नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काही राज्यांनी स्वीकारलेले नाही. तर काही राज्यांत सरकार बदलल्यावर आधी घेतलेला निर्णय बदलला गेला.शिक्षणाचा उद्देश आपल्या राजकीय विचारांशी सुसंगत नागरिक तयार करणे हा नसून राष्ट्रविकासासाठी सुयोग्य नागरिक तयार करणे हा आहे. भारतात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड आहे.त्या मानाने कृतिशील शिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा अपुऱ्या आहेत. यावर मात करण्यासाठी येथील परिस्थितीला योग्य असे प्रारूप तयार करावे लागेल. सरकार हे बदल घडविण्यासाठी किती गंभीर आहे, हे पाहावे लागेल. सरकारचा खासगीकरणाकडे वाढलेला कल साशंकता निर्माण करणारा आहे.आतापर्यंत अवलंबिलेल्या खडू , फळा आणि वर्ग याच साधनांवर यापुढे पूर्णपणे विसंबून राहता येणार नाही हे आता अधोरेखित झाले आहे. नवीन शिक्षणपद्धती निर्माण करताना संकल्पनात्मक शिक्षण, सर्वांगीण विकास, कौशल्य आणि व्यावसायिक शिक्षण या घटकांचा समावेश अनिवार्य आहे. फिनलंडची शिक्षणपद्धती त्यासाठी मार्गदर्शक ठरू शकते.फिनलंडमध्ये 'सिसू' हा शब्द 'ध्येयपूर्तीसाठी वाटेल ते' या अर्थाने वापरला जातो. तेत्याप्रमाणे काम करतात म्हणून यशस्वी होतात.आपणही तसा निश्चय करून नव्या दिशा आणि नवे मार्ग शोधले, तर शिक्षणपद्धतीत अपेक्षित असणारा बदल घडवता येईल. त्यासाठी सरकार, पालक० , शिक्षक, विद्यार्थी, व्यवस्थापन या घटकांनी आपली जबाबदारी पेलणे आवश्यक आहे. तरच हे शिवधनुष्य उचलणे शक्य होईल.

# बिलिफ सिस्टीम, म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन सक्सेस होण्यासाठीचा गुरु मंत्र

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

शून्यातून साम्राज्य निर्माण करणार्या लोकांच्या मेंदुत एखादी स्पेशल चिप बसवलेली असते का? जी त्यांना एक्स्ट्रा-ऑर्डिनरी बनवते? धीरुभाई अंबानी म्हटलं की काय आठवतं? पैसा, प्रगती, झपाटलेपणा, संपत्ती! तेच जेआरडी टाटा म्हटलं की पैशासोबतच सचोटी, दानशूरपणा आणि मूल्यांची जपणूक! स्टीव्ह जॉब्ज म्हणजे गॅजेट्सच्या जगातली क्रांती! आपल्याच देशातील कामयाब व्यक्तिमत्व तेंडुलकर किंवा अमिताभ म्हणजे शिस्त, प्रचंड आणि कठोर परिश्रम! जगाला प्रदुषणमुक्त करण्याचं स्वप्न बघणारा निकोल टेस्ला माहितीये? जगप्रसिद्ध व्हर्जिन ग्रुपचा मालक ‘रिचर्ड ब्रॅन्सन’? बारा बारा उद्योगामध्ये एक नंबरवर असलेला हा माणूस तुम्हाला नेहमी समुद्रकिनार्यावर मजा करताना दिसेल! ह्या लोकांनी जगाला प्रभावित केलं ह्याचं कारण काय? ह्या लोकांमधे असं काय वेगळं होतं, जे इतर लोकांकडे नव्हतं? ❋बिलीफ सिस्टीम तुम्हाला त्या पायाला दोरखंड बांधलेल्या हत्तीची गोष्ट माहितीये? त्याच्या मनावर लहानपणापासून बिंबवलेलं असतं की तो दोरखंड तोडू शकत नाही आणि म्हणून हा जगातला सर्वात शक्तिशाली प्राणी शेळी बनून जगतो, केवळ त्याच्या बिलीफ सिस्टिममुळे! आपल्या आयुष्यात आलेली संकटं, अपयश आपल्याला असं भासवतात की आपण दुर्बळ आहोत. पण आपण समजतो त्यापेक्षा कितीतरी जास्त शक्तीचा प्रचंड साठा आपल्या मनात आणि शरीरात दडलेला असतो. बिलीफ सिस्टीमचं एक उदाहरण देतो. समजा, तुम्ही तुमच्या नातेवाईकाच्या घरी एका कार्यक्रमाला गेला आहात. जेवणे चालू आहेत, वाढायला तुम्हीही त्या परिवाराला मदत करत आहात आणि कोणीतरी सांगतं, जा बरं, किचनमधून तेवढं मीठ घेऊन ये! तुम्ही किचनमध्ये जाता, पण मनात विचार येतो, इथे मी नवीन आहे, मला यांच्या घरातलं मिठाचं भांडं कसं सापडेल बरं? अस्ताव्यस्त किचनमध्ये आपल्याला ते मिठाचं भांडं दिसतच नाही, आपण रिकाम्या हाताने परत आलेलं पाहून ती व्यक्ती म्हणते, अरे समोरच तर ठेवलेलं आहे आणि आपल्या हाताला धरुन ती किचनमध्ये येऊन भांडं दाखवते आणि मिठाचं भांडं एकदम समोरच असतं. आपल्याला ते आधी सापडत नाही कारण आपण स्वतःला ऑर्डर दिलेली असते की ‘मला ते सापडणार नाही आणि आपलं अंतर्मन अगदी तसचं घडवतं.’बिलीफ सिस्टीम माणसाला यशाच्या शिखरावर पोहचवते किंवा





त्याची धूळधाण तरी करते. चांगली बिलीफ सिस्टीम म्हणजे, ‘माझ्याकडे काय नाही’, हे न पाहता, ‘माझ्याकडे काय काय आहे?’ याचा विचार करणं! रजनीकांत कंडक्टर होते. त्यांच्याकडे हिरोसाठी लागणारा गोरागोमटा, लोभस चेहरा नव्हता, पण त्यांच्याकडे स्टाईल आणि डायलॉग डिलीव्हरी होती. त्याने त्याच्यावर फोकस केला, आज ते जगातला असा एकमेव अभिनेता आहेत, ज्याचे पिक्चर जपानमध्येही हाऊसफुल्ल होतात. अमिताभला सांगण्यात आलं होतं, तुझी उंची तुझा हिरो बनण्यातला अडसर आहे. अनेक रिजेक्शन्स नंतरही अमिताभ निराश झाला नाही. त्याने स्वतःला विचारलं, माझ्याकडे काय चांगलं आहे? त्याने असा काही आवाज कमावला की दोन मिनिटांच्या निवेदनासाठी आज त्याला कोट्यवधी रुपये ऑफर होतात. जेफ बेजोस असो वा जॅक मा, स्टीव्ह जॉब्ज असो वा बिल गेटस, नारायण मूर्ती असो वा नरेंद्र मोदी, दिपिका पदुकोन असो वा माधुरी दिक्षीत, महेंद्रसिंग धोनीपासून संदीप महेश्वरीपर्यंत, स्वामी विवेकानंदांपासून, विवेक बिंद्रांपर्यंत, कोणतंही, तुमचं फेव्हरेट असलेलं कोणतंही कॅरॅक्टर तुमच्या डोळ्यासमोर आणून बघा, त्याच्या यशाचं उत्तर तुम्हाला त्याच्या बिलीफ सिस्टीममध्ये सापडेल. तर मित्रांनो, यशस्वी आणि आनंदी आयुष्य जगण्याच्या बाबतीतही ही बिलीफ सिस्टीम आपल्याला एकतर खूप मदत करते किंवा आपल्या मार्गात आडवी येते. ज्याचा बिलीफ खूप सशक्त आहे, ती व्यक्ती आपल्या आयुष्यात चमत्कार घडवू शकते. असे कित्येक अविश्वसनीय चमत्कार मी माझ्या आयुष्यात कित्येकदा अनुभवले आहेत आणि रोज कित्येक जणांसोबत ते घडतानाही पाहतो आहे, तुमची बिलीफ सिस्टीम कशी आहे? ती तुम्हाला साथ देते की नाही? का तिच्यामागे तुम्ही फरफटत जात आहात? लॉ ऑफ अट्रॅक्शन, व्हिज्युयलाजेशन, स्वसंमोहन, अफर्मेशन अशा अनेक पद्धती माणसाची बिलीफ सिस्टीम बदलण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. बिलीफ सिस्टीमला मजबूत करण्यासाठी, आपल्या स्वप्नांच्या पंखांना अतूट विश्वासाचं बळ देण्यासाठी, उत्तम, जाणकार व अभ्यासू समुपदेशक मोठी मदत करू शकतात. तुमची बिलीफ सिस्टीम उतुंग भरारी घेवो यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा! ज्याची बिलीफ सिस्टीम स्ट्राँग, त्याला या जगात अशक्य असे काहीच नाही.

# जासई हायस्कूलमध्ये कर्मवीर जयंती निमित्त पालखी सोहळा संपन्न

**उरण । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील जुनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई या विद्यालयात २२ सप्टेंबर कर्मवीर जयंती रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक ,पद्मभूषण, डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते कर्मवीरांच्या पुतळ्याचे पूजन केले. तसेच विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या थोर महापुरुषांच्या पुतळ्यांचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केले गेले. विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका पाटील एस. एस. यांच्या हस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन केले.फुलांनी सजविलेल्या पालखीत



कर्मवीरांची प्रतिमा ठेवून विद्यालयाच्या लेझीम व बँड पथकाच्या गजरात पालखीची मिरवणूक सर्व शिक्षक,विद्यार्थी यांच्या समवेत संपूर्ण जासई गावातून फिरली. यावेळी पालक व ग्रामस्थ यांनी कर्मवीरांच्या पालखीचे दर्शन घेतले तसेच सुवासिनींनी कर्मवीरांच्या पालखीला ओवाळणी केली.कर्मवीरांच्या जयघोषात पालखी शाळेच्या मैदानावर माघारी आली. या कर्मवीर जयंतीच्या निमित्ताने जासई गावातील दानशूर व्यक्तिमत्व अमृत ठाकूर यांनी त्यांच्या पत्नी कै.सौ.ठाकूर यांच्या स्मरणार्थ विद्यालयातील गोर-गरीब व गरजू विद्यार्थ्यांना ३००० वह्यांचे वाटप केले. या कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत , सरपंच संतोष घरात, रघुनाथ पाटील ,यशवंत घरत ,अमृत ठाकूर , अविनाश पाटील,प्रभाकर मुंबईकर, जी.सी.घरत, मधुकर पाटील,धर्मदास घरत,पद्माकर घरत,महादेव म्हात्रे,शिक्षण प्रेमी नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नूरा शेख, प्रा. अतुल पाटील यांनी केले.

# डॉ.विखे पाटील कृषी महाविद्यालयात फ्रेशर पार्टीद्वारे नवगतांचे स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यानी ध्येय निश्चित करुन कठोर परिश्रम घेतल्यास यश निश्चित मिळत असते. शिक्षक हे आपले जीवन घडविणारे खरे मार्गदर्शक आहे. त्यामुळे त्यांचा नेहमीच आदर केला पाहिजे. तुमचे स्वागत सिनिअर विद्यार्थी करत आहेत, ही आनंददायी बाब आहे. कारण गेल्या काही वर्षांत रॅगिंगचे प्रकार वाढले असतांना विखे पाटील कृषी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमधील नाते दृढ करणारा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांनी आपआपसात स्नेहभाव ठेवून शिक्षण घ्यावे. आजही ही मैत्री जीवनात अनेकवेळा उपयोगी पडत असते. कॉलेजचे जीवन हे भारावून टाकणारे असेच असते. याचा आनंद घ्या, असे प्रतिपादन कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरिक्षक गजेंद्र इंगळे यांनी केले.विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरिक्षक गजेंद्र इंगळे, प्राचार्य डॉ. एम. बी.धोंडे, उपप्राचार्य डॉ. एस. बी. राऊत,प्राध्यापक, शिक्षकवृंद उपस्थित होते.याप्रसंगी प्राचार्य डॉ.एम.बी.धोंडे म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, शिक्षण




पुर्ण झाल्यावर परिपूर्ण विद्यार्थी बाहेर पडावा, त्याला पुढील वाटचालीस कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नये यासाठी विशेष प्रयत्न केले जात असतात. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समन्वय रहावा, त्यांच्यातील मैत्री घट्ट व्हावी, त्यांच्यातील न्यूनगंड दूर व्हावा, यासाठी महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करुन त्यांना आपल्या परिवारातील सदस्य बनविले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्येही आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे आज या महाविद्यालतील माजी विद्यार्थी अनेक उच्चस्थ पदावर, व्यावसायिक म्हणून कार्यरत असल्याचे प्राचार्य धोंडे यांनी सांगितले.यावेळी विद्यार्थ्यांनी स्वत:चा परिचय करुन दिला.विद्यार्थ्यांसाठी रॅम्पवॉक, संगीतखुर्ची, पारंपारिक नृत्य व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन कु.वैष्णवी बनकर व दर्शन बोरुडे यांनी केले. प्रास्तविकात उपप्राचार्य डॉ.एस.बी.राऊत यांनी महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी ऋषीकेश कदम व कु.अनुष्का तुपे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थेचे प्रभारी सचिव डॉ.पी.एम.गायकवाड, उपसंचालक प्रा.सुनिल कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल

## पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरात सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जनाचा कार्यक्रम दि. २८ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येत आहे.मुंबई पोलीस अधिनियम-१९५१ च्या कलम ३३ (१)(ब) नुसार सार्वजनिक ठिकाणाची रहदारी व सुव्यवस्था राखण्यासाठी व करावयाच्या नियमनासाठी शहरामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जनाच्या कार्यक्रमाच्या रहदारीला अडथळा होऊन जनतेला त्रास होवू नये,कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणुन चंद्रपूर शहरातील मुख्य मिरवणुकीचा मार्ग दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासुन ते दि. २९ सप्टेंबर रोजीचे पहाटे ६ वाजेपर्यंतच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वाहनांची रहदारी वळविण्यात येत आहे,असे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी कळविले आहे.गणेश विसर्जन मुख्य मिरवणुक सोहळा पार पडेपर्यंत प्रियदर्शनी चौक ते जटपुरा गेट-कस्तुरबा चौक मार्गे गांधी चौक ते जटपुरा गेट मार्गे,रामनगर रोड मार्गे संत केवलराम चौक-इरई नदी (दाताळा पुल) हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांना बंद करण्यात येत आहे. नागपूर रोडने येऊन बल्लारशा किंवा मुलकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही प्रियदर्शनी चौकाकडे जाण्यास बंदी करून सर्व प्रकारची वाहने ही वरोरा नाका उड्डानपूल-सावरकर चौक ते बंगाली कॅम्प,मुल किंवा बल्लारशाकडे जातील.मुल किंवा बल्लारशाकडुन नागपूरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही बंगाली कॅम्प -सावरकर चौक,वरोरा नाका नवीन उड्डाणपुल मार्गे नागपूरकडे जातील. नागपूरकडुन शहरामध्ये जाणारी सर्व वाहने (जड वाहने वगळून) छोटा नागपुर मार्गे दाताळा चौक-देवाळा गांव-चोराळा टी पॉइंटवरून बिनबा गेट किंवा पठाणपुरा गेट मधुन शहरात प्रवेश करतील. चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन हद्दीतील रहीवाशांनी नागपुर,वणी,घुग्घुस व गडचांदुरकडे जाण्याकरीता रहमत नगर,नगीनाबाग व इतर परीसरातुन जाण्यासाठी बिनबा गेट-चोराळा-दाताळा आदी मार्गाचा अवलंब करावा. बल्लारशा व मुलकडुन येणा-या सर्व वाहनांना (जड वाहने वगळून) शहरामध्ये जायचे असल्यास बसस्टँड-एलआयसी ऑफीस- बगड खिडकी मार्गे किंवा जुनोना चौकातुन शहरामध्ये किंवा प्रसन्ना पेट्रोल पॅम्पकडुन बाबुपेठ मार्गे शहरात फक्त अंचलेश्वर गेटपर्यंत प्रवेश करता येईल.या ठिकाणी असेल नो पार्किंग व'नो हॉकर्स झोन':गणेश विसर्जन मुख्य मिरवणुक सोहळ्यादरम्यान नो पार्किंग झोन व'नो हॉकर्स झोन'करण्यात आले आहे. यामध्ये,जटपुरा गेट ते कस्तुरबा चौकपर्यंत,जटपुरा गेट ते रामनगर रोड मार्गे दाताळा पुलपर्यंत,जटपुरा गेट ते प्रियदर्शनी चौकपर्यंत,कस्तुरबा चौक ते गांधी चौक ते जटपुरा गेटपर्यंत,कस्तुरबा चौक ते अंचलेश्वर गेटपर्यंत,गांधी चौक ते मिलन चौक ते जोड़ देऊळपर्यंत,कस्तुरबा चौक ते जेल रोड चौक पर्यंत,दस्तगीर चौक ते मिलन चौक,मिलन चौक ते बजाज पॉलीटेक्नीक कॉलेज,पोटदुखे यांच्या घरापासुन ते श्री टॉकीज पर्यंत,हिंदी सिटी हायस्कुल ते रघुवंशी कॉम्प्लेक्सपर्यंत,मौलाना आझाद चौक ते जयंत टॉकीजपर्यंत,छोटा बाजार चौक ते पाताळेश्वर मंदीरपर्यंत नो पार्किंग झोन व'नो हॉकर्स झोन'घोषित करण्यात आल्याने मिरवणुक व वाहतुक मार्गावर नागरीकांनी,व्यवसायिकांनी तसेच गणेश विसर्जन भक्तांनी कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग किंवा उभी करू नये.मुख्य मिरवणुक मार्गावर राहणाऱ्या रहीवाशांना स्वतःच्या पार्कीगकरीता जागा नसल्यास त्यांना आपली वाहने जुबली हायस्कुलचे पटांगण,महानगरपालीकेच्या बाजुला असलेली पार्किंग या ठिकाणी उभी करता येतील. परंतु मिरवणुक संपल्यानंतरच ती वाहने तेथुन काढता येतील. त्याचप्रमाणे,चंद्रपुर शहरात मोठ्या प्रमाणात साजरा होणारा गणपती विसर्जन सोहळा पाहण्यासाठी शहरातील व इतर ग्रामीण भागातून नागरीक येत असतात. दरम्यान शहरात वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन नागरीकांना पार्किंग झोन उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.चंद्रपूर शहरातील व इतर ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरीकांसाठी उपलब्ध पार्किंग झोन :चांदा क्लब ग्राउंड,डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,वरोरा नाका,सेंट मायकल हायस्कुल,नगीनाबाग सिंधी पंचायत भवन,संत केवलराम चौकजवळ रामनगर,व्यायाम शाळा ग्राउंड,पठानपुरा चौक,डी. एड. कॉलेज ग्राउंड बाबुपेठ,महाकाली मंदीर ग्राउंड,चंद्रपुर ही ठिकाणे दि. २८ सप्टेंबर २०२३ चे सकाळी ६ वाजेपासुन ते दि. २९ सप्टेंबरचे सकाळी ६ वाजेपर्यंत नागरीकांसाठी पार्किंग स्थळे म्हणुन घोषीत करण्यात येत आहेत. नागरीकांनी आपली वाहने शहरात न आणता दिलेल्या पार्किंग स्थळी पार्क करावीत. जनतेने विसर्जनादरम्यान वाहतूक व्यवस्थेचे पालन करून शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरितापोलीस प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी केले आहे.

# नगर सनातन धर्मसभा यांच्यावतीने ऋषीतुल्य व्यक्तींचा सन्मान



**अहमदनगर । प्रतिनिधी**

ऋषी पंचमी हा दिवस शुद्धीकरण आणि प्रायाश्चित पाळण्याचा असतो. या दिवशी ऋषींना स्मरण करुन त्यांच्याप्रती समाजात चांगले काम करुन अध्यात्मिक, विविध क्षेत्रात योगदान देऊन समाजसेवेचे व्रत जोपासणार्या व्यक्तींचा सन्मान करणे हे एकव्रत आहे. ते व्रत जोपासत ऋषीतुल्य व्यक्तींचा आदर करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन धर्मसभा उपाध्यक्ष वेदमुर्ती महेश रेखे यांनी केले.सनातन धर्म सभेच्यावतीने ऋषीपंचमी निमित्त गायत्री मंदिरात नगर शहरातील नामवंत, ज्येष्ठ अशा ऋषीतुल्य व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी वेदमूर्ती महेश रेखे, नगर सनातन धर्मसभा शाखेचे अध्यक्ष दत्तोपंत पाठक, उपाध्यक्ष डॉ.नंदकिशोर मुळे, निळकंठ देशमुख, दिनकर देशमुख, ॲड.उमेश नगरकर, रमेश देशपांडे, उमेश वाळूंजकर, गिरिष मुळे, अनंत देशपांडे, सुरेखा देशपांडे, गणेश वैकर व सत्कारमुर्ती उपस्थित होते.श्री.रेखे पुढे म्हणाले, नगर सनातन धर्मसभेचे ११७ व्या वर्षात पदार्पण होत आहे हा वटवृक्ष चांगलाच मोठा झाला आहे. सर्वांनी चांगले काम करत या शाखेला दृढता, बळकटी आली आहे. सर्वसामान्य लोकांनी या सनातन धर्मसभेस तन-मन-धनाने सहकार्य केल्याने वैभवशाली अशी धर्मसभा झाली याचा आनंद आहे.यावेळी श्री. महेश रेखे व दत्तोपंत पाठक यांचे हस्ते १० ऋषीतुल्य मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. श्रीगोपाल धूत, डॉ.सुधा कांकरिया, श्रीमती कुमुदिनी बोपर्डीकर, श्रीकृष्ण जोशी, सुरेश देशमुख, मोहन लुल्ला, प्रकाश गटणे, हभप केंद्रे महाराज, जनार्दन वाळूंजकर, मोहन नातू यांचा समावेश होता.प्रास्तविकात दत्तोपंत पाठक यांनी सांगितले की, १९७० ला मी धर्मसभेचा सदस्य झालो. माझी कार्यक्षमता व धर्मसभेचे काम पाहून आता अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडत असताना अनेक चांगले उपक्रम राबविले. यावेळी सत्कारमुर्ती प्रसिद्ध उद्योजक, डॉक्टर, संगीत विशारद यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सनातन धर्मसभेच्या नगर शाखेच्या कार्याचे कौतुक केले. धर्मसभा उपाध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे यांच्या निवडीमुळे नगरचे नाव उंचावले असे हभप केंद्रे महाराज यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर देशमुख यांनी केले तर निळकंठ देशमुख यांनी आभार मानले.



**मुकेश रामदासजी पत्रे कृषी सहाय्यक वणी व कोमल मुकेश पत्रे लिपिक इंडियन ओव्हरसीज बँक चंद्रपूर यांच्या वणी येथील निवस्थानी ज्येष्ठा गौरी पूजन**

# पिजदूरा येथे मधमाशी पालन व रेशीम शेतीवर जनजागृती

**वरोरा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची व आधुनिक शेती पद्धतीची माहिती मिळावी व त्यातून त्याच्या आर्थिक उत्पादनात वाढ होऊन शेतकरी समृद्ध व्हावा याकरिता नवनवीन आधुनिक प्रयोगात्मक माहिती देण्यासाठी महारोगी सेवा समिती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित आनंद निकेतन कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पिजदुरा येथे कृषी दुतांनी मधमाशी पालन व रेशीम शेतीविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना जोड व्यवसायासोबत अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी गावामध्ये सातव्या सत्राच्या विद्यार्थ्यांनी मधमाशी पालन व रेशीम शेती याची सखोल माहिती शेतकऱ्यांना सांगण्याचा प्रयत्न केला. ही माहिती तक्त्याद्वारे शेतकऱ्यांना पटवून दिली. विद्यार्थ्यांनी




मधमाशी बद्दल सखोल माहिती व त्यांचे प्रकार तसेच त्यांचे पालन याचे संपूर्ण मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले. मध हे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. तसेच मधमाशी अनेक प्रकारच्या पिकांना लाभदायक असते. रेशीम शेतीमध्ये येणाऱ्या अडचणी व रोग आणि कीड यांच्यावर कृषीदूतांनी परिपूर्ण असे मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले. रेशीम शेती केल्याने उत्पन्न वाढते तसेच ही शेती कोरडवाहू भागात पण केली जाऊ शकते. रेशीमला आज बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. अशाप्रकारे कृषी दुतांनी शेतकऱ्यांना मित्र कीड बद्दल माहिती सांगण्याचा प्रयत्न केला.कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन , कार्यक्रम समन्वक डॉ. एस. एन. पंचभाई , डॉ. ए. ए. मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमांमध्ये सातव्या सत्राचे विद्यार्थी हर्षल लोथे, शुभम गुंजाळ, ज्ञानेश्वर तायडे, हिमांशू सोनटक्के, भवानी प्रसाद व स्वरांशु मून इत्यादी सहभागी झाले होते.

# राष्ट्रीय मानव अधिकार संगठन जिल्हा कार्यकारी अध्यक्ष पदी शंकर ढोलगे यांची निवड

**गडचिरोली–** गडचिरोली जिल्ह्यातील मागासलेल्या आलापल्ली सारख्या भागात समाजसेवेचा वसा उराशी बाळगून दिवस-रात्र गरीब, निराधार व सर्वसामान्य



जनतेच्या सुख दुःखात स्वतःला वाहून घेणारे शंकर ढोलगे यांनी भामरागड, एटापल्ली या सारख्या दुर्गम, अतिदुर्गम व अति मागासलेल्या आदिवासी बहुल परिसरात स्वतः पुढाकार घेवून सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमातून समाजाला जागृत करण्याचे अनेक कामे त्यांनी केलेली आहेत.या सर्व कार्याची दखल घेवून, राष्ट्रीय अध्यक्ष महेश पटेल, व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष प्रणय खुणे, यांनी राष्ट्रीय मानवाधिकार संघटन गडचिरोली जिल्हा कार्यकारी अध्यक्ष पदी शंकर ढोलगे यांची नियुक्ती करण्यात आली . त्यांच्या झालेल्या नियुक्तीचे प्रदेश सचिव ज्ञानेंद्र बिस्वास, विदर्भ अध्यक्ष जावेद अल्ली, जिल्हाध्यक्ष किशोर शंभरकर, एड. ज्योती डोके, प्रशांत जोशी, अजय ठाकरे, मनीषा आलाम, सुरेश अलोणे, राजेंद्र चिमरालवार, तसेच आलापल्ली, ऐटापल्ली, भामरागड परिसरातील अनेक जनसामान्य, प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांच्या नियुक्तीचे स्वागत केलेले आहे.

# हंसराज अहीरांनी खांबाड्यातील बांधावर पोहचून रोगाने उध्दवस्त सोयाबिन पिकांची केली पाहणी

## सोयाबिनच्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण व नोंदी घ्याव्या–हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील शेकडो गावातील शेतकऱ्यांचे सोयाबिन पिक करपासारख्या अज्ञात रोगाने शंभर टक्के उध्दवस्त झाल्याने शेतकऱ्यांचे हितैषी, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दि. २२ रोजी दिल्लीहून चंद्रपूरास परततांना खांबाडा या गावास भेट देवून उध्दवस्त झालेल्या सोयाबिन पिकाची शेतावर जावून पाहणी केली. शेतकऱ्यांनी नुकसानीबाबत तक्रारी करूनही तालुका प्रशासनाचे अधिकारी व अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी केली नसल्याने प्रशासनाच्या भुमिकेवर रोष व्यक्त करीत या नुकसानीचा त्वरीत सर्व्हे करून नुकसानीचा अहवाल शासनाकडे मदतीकरीता सादर करण्याचे निर्देश दिले. यावेळी हंसराज अहीर यांनी खांबाडा येथील नामदेवराव धोटे व महादेव चाफले यांच्या शेतीवर जावून पिकांची





पाहणी केल्यानंतर पिडीत शेतकऱ्यांनी करपासदृष्य रोगामुळे खांबाडासह वाटोळा, कोसरसार, बारव्हा, पट्टापूर, बोपापूर, रामपूर, वडगांव आदी गांवातील मागासवर्गीय, दलित, आदिवासी शेतकऱ्यांचे संपुर्ण सोयाबिन रोगाने उध्दवस्त झाल्याची माहिती दिली.सन २००८ मध्ये लष्करी अळीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. यंदा करपा सदृष्य अन्य रोगामुळे सोयाबिन संपूर्ण उध्दवस्त झाल्याने २००८ ची पुनरावृत्ती झाली असून हा रोग जिल्हाभर सर्वत्र पसरण्याची स्थिती निर्माण झाली असल्याच्या तक्रारी येत असून या संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचा हात देण्याची गरज असल्याने जिल्हा प्रशासनाने या संकटाची गंभीरपणे दखल घेवून तातडीने नुकसानीचे सर्वेक्षण व नोंदणी घेण्याचे सुचनावजा आदेश हंसराज अहीर यांनी पत्राद्वारे दिले आहेत.खांबाडा शिवारात नुकसानीची पाहणी करतांना हंसराज अहीर यांच्या समवेत भाजप पदाधिकारी माजी जि.प. सदस्य राजु गायकवाड, वसंता बावने, संतोष उरकुडे, अशोक ताजने, इन्द्रपाल ताजने, डॉ. मोरेश्वर राऊत व गांवातील पिडीत शेतकरी बांधव उपस्थित होते.

---

### बेशरमची झाडे लावून प्रशासनाचा निषेध

## शंकरपूर येथील युवकांनी केली आगळेवेगळे आंदोलन

**चिमूर । प्रतिनिधी**

कांपा चिमूर हा राज्य महामार्ग आहे या रस्त्यावर पडलेले खड्डे हे अपघाताला आमंत्रण देत आहे. बांधकाम विभागाकडून हे खड्डे बुजविन्यात आले नसल्याने त्या खड्यामध्ये बेशरमाचे झाडे लावून येथील युवकांनी बांधकाम विभागाचा निषेध केला. चिमूर कांपा हा राज्य महामार्गालगत १५ गावे बसले आहे तर रस्त्याच्या परिसरात ३० गावे आहेत तर ३३ किलोमीटर चे अंतर आहे या सर्व गावातील नागरिकांना या रस्त्याचा वापर करावा लागतो परंतु या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत शंकरपूर ते कांपा या आठ किलोमीटर च्या अंतरावर तर जीवघेणे खड्डे आहेत या रस्त्यावरून दुचाकी चालविणेही कठीण झाले आहे या रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने मुरूम व गिट्टी टाकून दोनवेळा बुजविले परंतु खड्डे आहे तसेच आहे त्यामुळे खड्डे बुजविण्याच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून खड्डे बुजविण्यासाठी आलेला लाखो रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे त्यामुळे हा रस्ता होणार की नाही असा प्रश्न निर्माण झाला असून सध्यातरी या रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजविण्यात यावे यासाठी येथील युवकांनी बेशरम चे झाडे लावून लक्ष वेधले आहे हे बेशरम चे झाडे आमोद गौरकर ,अशोक चौधरी, आशिष चौधरी ,निखील गायकवाड ,आशु हजारे, गणेश वानकार, साधू गेडाम ,विनोद घरत ,अमन मेश्राम प्रियंशु वाढई, नंदू शेरकी, मनोज सहारे ,रुपेश रंदये, बबलू शेख आदिंनी लावले यावेळी गावातील बहुसंख्य नागरीक उपस्थित होते .

---

### अहेरी आदिवासी विकास प्रकल्पांतील ११ शासकीय आश्रमशाळांमध्ये राबवणार प्रयोग

## आदिवासी आश्रमशाळेतील शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी खासगी शिकवणी

**आनंद दहागावकर । गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी अहेरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ११, शासकीय आश्रम शाळांमध्ये दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी विशेष खासगी शिकवणी वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळांमध्ये खाजगी शिकवणी हा पहिलाच प्रयोग आहे. हा निर्णय एका बाजूने विद्यार्थ्यांना सुखावणारा असला तरी याची दुसरी बाजू अंधकारमय असल्याच्या वेदनाही स्पष्ट दिसत आहेत.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना अर्थात न्युक्लियस बजेट सन २०२१-२२ अंतर्गत अहेरी प्रकल्पांतर्गत येत असलेल्या ११ शासकीय आश्रम शाळेतील दहावी व बारावी (कला व




विज्ञान) विद्यार्थ्यांना विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करणे बाबतची योजना मंजूर करुन त्यासाठी संबंधित प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.आश्रम शाळांमध्ये अध्यापकांची कमतरता, अपुऱ्या सुविधा, प्रयोगशाळांचा अभाव, शिक्षकांचे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष अशा अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. या पार्श्वभूमीवर आदिवासी आश्रमशाळा म्हणजे भोजन व्यवस्था असलेले आवासीय केंद्र बनलेले आढळते. ही बाब लक्षात घेता अहेरी उपविभागात नव्यानेच रुजू झालेल्या वैभव वाघमारे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी आश्रम शाळांच्या दर्जोन्नतीकरणाचे पाऊल उचलले आहे. या योजनेनुसार ११ ही आश्रमशाळेतील दहावी आणि बारावी कला आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक सत्रात आश्रमशाळेत जाऊन संबंधित विषयाचे प्रशिक्षण देणे, असे स्वरूप आहे. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढून कॉपीमुक्त परीक्षा देण्यासाठी ते तयार व्हावेत असा हेतू असल्याचे वैभव वाघमारे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी यांनी सांगितले.

---

## गुणवान विद्यार्थ्यांवर होईल चंद्रपूरच्या प्रगतीचे मूल्यांकन

### वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन



**तर यश हमखास**

बालकाला जन्म देणाऱ्या आईप्रमाणे इच्छाशक्ती असायला हवी. कारण आईच्या हातून तान्ह लेकरू कधीच खाली पडत नाही. आईच्या अंतर्मनात तिचं बाळ असतं. आपण ठरविलेले लक्ष्य अंतर्मनात पोहचविले तर यश हमखास आहे. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याने यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले.

**यापेक्षा दुसरा आनंद कोणता!**

‘विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये ज्ञानप्रकाश निर्माण होण्यासाठी वृत्तपत्र वाचनालये उभी केली. जिल्ह्यात दर्जेदार वाचनालये उपलब्ध करून दिली. पीएसआय, नायब तहसीलदार जेव्हा मला भेटून सांगतात की तुमच्या वाचनालयात अभ्यास करून आम्ही आज अधिकारी झालो, तेव्हा मला कमालीचा आनंद होतो,’ अशी भावनाही ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

**हा वाघाचा जिल्हा आहे**

‘या शिबिरात सहभागी झालेले सगळे विद्यार्थी चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण होतील आणि कृषी विभागात उत्तम काम करतील,असा विश्वास मला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना कष्ट करावे लागतील. चंद्रपूर जिल्हा मागास नाही, हा वाघाचा जिल्हा आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी या विद्यार्थ्यांवर आहे,’ असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आपल्याकडे किती खाणी आहेत, किती नवीन उद्योग आले, हे चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रगतीचे मापदंड आहेतच. पण, चंद्रपूरमध्ये किती गुणवान विद्यार्थी आहेत, हा देखील प्रगत जिल्ह्याचा अत्यंत महत्त्वाचा निकष ठरतो. त्यामुळे अधिकाधिक गुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

मा. ना. सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र तथा भाजपा राजुरा जनसंपर्क कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजुरा येथे मोफत कृषी सेवक भरती तथा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी आमदार सुदर्शन निमकर, जिल्हा कृषी अधिकारी शंकर तोटावार, तालुका अध्यक्ष सुनील उरकुडे, अरुण मस्की, सतीश धोटे, साईनाथ मस्टे, उपविभागीय कृषी अधिकारी गिरीश कुलकर्णी, दिलीप वांढरे, वाघुजी गेडाम, लक्ष्मीकांत मासिरकर, किशोर कुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बिहार आणि महाराष्ट्रातील आयएएस, आयएफएसच्या तुलनात्मक टक्केवारीवर बोलताना ना.सुधीर मुनगंटीवार म्हणाले, ‘२००७ मध्ये मी विधानसभेत आयएएस, आयपीएस, आयएफएस, आयआरएसचा टक्का महाराष्ट्रात कमी असल्याचा मुद्दा मांडला होता. त्यावर समितीदेखील गठीत झाली होती. महाराष्ट्रातील परीक्षार्थींचे या परीक्षा उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अत्यल्प होते. आपण ज्याला मागास राज्य समजतो अशा बिहारमधून या अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्यांची संख्या खूप आहे. मग आपल्याकडे ही संख्या कमी का, असा प्रश्न होता. त्यावर बिहारमधील तज्ज्ञांशी आम्ही चर्चा केली. बिहारमधील शिक्षण पद्धतीने योग्य नसल्याची चर्चा आम्ही ऐकतो. मग असे कसे घडते, असा प्रश्न त्यांना केला. तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आमच्याकडे एखाद्या घरी मुलगा जन्माला आला, की भविष्यात तो पंतप्रधान, मुख्यमंत्री होईल, असे स्वप्न वडील बघतात. पण यापैकी काहीही होऊ शकत नाही, असे जेव्हा लक्षात येते तेव्हा मुलगा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट (जिल्हाधिकारी) होईल असे स्वप्न वडील बघतात. याचाच अर्थ जो मोठी स्वप्न बघतो तोच यशस्वी होतो. आपल्या संकल्पांना प्रयत्नांच्या पराकाष्टेची जोड देणाराच यशस्वी होत असतो. आणि त्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती लागते.’ मार्गदर्शन शिबिरातून हे नक्कीच साध्य होईल, असा विश्वासही ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .